झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/झोपुआ /गणेशपेठ/२०२० 10480
दिनांक : ०२/०६/२०२०

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद पेठ गणेश पेठ सि.स.नं.११२ येथील नवजीवन ११२ गणेश पेठ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्ण झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ ३१२.५० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१०/१२/२०१० रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र सरकारी असून या क्षेत्राचे मालकी हक्क / विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

ज्याअर्थी, सदरच्या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत क्षेत्रिय अधिकारी, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांचा अहवाल जावक क्रमांक BWO/१५५८ या प्राधिकरणास दि.१४/०७/२०११ रोजी प्राप्त झालेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या क्षेत्राची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१ यांनी समक्ष स्थळपाहणी करुन या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असल्याचा दि.०४/०९/२०१९ रोजीचा अहवाल सादर केला आहे. सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याची माझी खात्री पटली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०४/०७/२०१९ पृष्ठ क्र.७ व ८ वर तसेच दैनिक महाराष्ट्र निरोप्या व महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात दि.१८/०३/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर दि.१९/०३/२०१९ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांची कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पुर्वसूचनेची जाहीर नोटीस वर मे.राफे लकडावाला व्हेंचर्स यांची विहीत मुदतीत हरकत प्राप्त झाली होती. त्यास अनुसरुन त्यांना प्रत्यक्ष सुनावणी देण्यात आली असुन त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आलेली आहे व त्यांचेकडून प्राप्त झालेले हरकत आणि पुरावे विचारात घेऊन सदरची हरकत फेटाळण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त सर्व हरकत आणि पुरावे आणि नमुद बाबी विचारात घेऊन, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

<u>झोपडपट्टीचे नाव</u> :- नवजीवन ११२ गणेश पेठ

<u>महानगरपालिका क्षेत्र</u> :- पुणे महानगरपालिका

| पेठ | सि.स.नं. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत: | घट | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गणेश पेठ | सि.स.नं.११२ | ३४०.१९ चौ. मी. | २७.६९ चौ.मी. | ३१२.५० चौ. मी. | महाराष्ट्र शासन | पुर्वेस - शेख हॉस्पिटल | |
| | | | | | | पश्चिमेस - न.भु.क्र.६५,६२,६६, ६७ | |
| | | | | | | दक्षिणेस - न.भु.क्र.१२५ | |
| | | | | | | उत्तरेस - न.भु.क्र.१११ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक** :- ०२/०६/२०२०

2-6 2020

**राजेंद्र निंबाळकर** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना (जमीन शासकिय मालकिची असल्यास आणि संबधित विभागाचे पुणे स्थित कार्यालय प्रमुखाचे नावे)
आपले लक्ष उक्त अधिनियमाच्या सुधारित कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या अथवा आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास ते क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल तसेच अशा शासकिय मालकीच्या तसेच संपादित खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल इतका अनुज्ञेय असेल.

२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपुप्रा पुणे यांना सुचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजना क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

४. सहाय्यक संचालक नगररचना, झोपुप्रा., पुणे यांना सुचित करण्यात येते कि, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात समाविष्ट ज्या शासकिय क्षेत्राचे विकसकास हक्क प्राप्त नाहीत

त्या क्षेत्राचे भूसंपादनाची तसेच संपादित शासकीय क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यासाठीची कार्यवाही करावी.

५. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.

६. विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. २४ संकल्प आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे-०४ यांना माहितीस्तव.